प्रेसनोट दि.07.03.2024

शांतीनगर पोलीस ठाणे - अन्न सुरक्षा आणि मानके

दि.06.03.2024 रोजी सायंकाळी 19.00 वा. चे सुमारास, शांतीनगर पोलीस ठाणे चे पथकास मिळालेल्या माहितीवरून, सपोनि/तपासे, पोशि/4717 सानप व त्यांचे पथकाने, स्टार कॉम्प्लेक्स, गैबीनगर, भिवंडी येथे छापा टाकला असता, सदर ठिकाणी आरोपी क्र.1) फरमान अहमद मंजुर अहमद अन्सारी, वय 24 वर्षे 2) वकार अहमद मंजुर अहमद अन्सारी 3) सौहराब अहमद यांनी आपसांत संगनमत करून महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधीत केलेला तंबाखुजन्य पदार्थ गुटखा, पानमसाला, सुगंधीत तंबाखु, स्वादिष्ट सुगंधित सुपारी असा एकुण 7,77,060/- रूपये किमंतीचा माल विक्रीकरिता बेकायदेशीररित्या वाहतुक करीत असताना मिळुन आला. सदर प्रकाराबाबत सरकारतर्फे दिलेल्या फिर्यादी वरून आरोपींविरूध्द गुन्हा रजि. नं. I 779/24 भा.द.वि.कलम 328,272,273,188,34 सह अन्न सुरक्षा व मानके कायदा 2006 कलम 26(2), 27, 23, 30(2)(अे) सह शिक्षा कलम 59 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपी क्र.1 यास अटक करण्यात आली असून दोन फरारी आरोपींचा पोलीस शोध घेत आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि/तपासे हे करीत आहे.

जनसंपर्क अधिकारी,
पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर